# विद्यापीठात जनरल रिलेटीव्हीटीवर आंतरराष्ट्रीय परिषद

अमरावती, दि.२३ : प्रख्यात शास्त्रज्ञ आईनसाईनच्या सापेक्षता सिद्धांतला यावर्षी शंभर वर्ष पूर्ण होत असतांना संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाने राष्ट्रीय गणित दिवसाचे औचित्य साधून विद्यापीठात जनरल रिलेटीव्हीटीवर आंतरराष्ट्रीय परिषद आयोजित केली आहे. जगभरातील संशोधक व शास्त्रज्ञ या तीन दिवसीय परिषदेला हजेरी लावणार आहेत.

आईनस्टाईन यांनी न्यूटनच्या गुरुत्वाकर्षण सिद्धांतातील त्रुट्यांचा विचार करून सापेक्षता सिद्धातांची मांडणी केली होती. यास गणितीय शास्त्र व त्याला भौतीकशास्त्राची सुद्धा जोड आहे. यानुसार कॉन्टम मॅकेनिक्स आणि जनरल रिलेटीव्हीटी हे भौतिक शास्त्रातील दोन सिद्धांत महत्वपूर्ण असे असून यात प्रचंड संशोधन होत आहे. विदर्भातील अनेक संशोधक यावर संशोधन करीत आहेत. ब्रम्हाडाची निर्मिती बिग बॅंग (महास्फोटाने) झाल्याचा सिद्धांत पुढे आला आहे. याच पार्श्वभूमीवर विद्यापीठातील गणित विभागाने आंतरराष्ट्रीय परिषदेने आयोजन केले असून त्यास महत्व प्राप्त झाल्याचे कुलगुरु डॉ.मोहन खेडकर यांनी आज पत्रपरिषदेत सांगितले. विद्यापीठाने २००५ मध्ये अशाच परिषदेचे आयोजन करण्यात केले होते. विद्यापीठाच्या गणित विभागाचे प्रमुख डॉ.के.एस. अढाव यांनी यावेळी सांगितले, परिषदेत जनरल रिलेटीव्हीटी सह मोडीफाईड थेअरीज ऑफ ग्रॅव्हीटी आदी विषय निश्चित करण्यात आले, आहेत. परिशषदेत स्पेनचे डॉ. सरगेई ओडीनत्साव, भारतातील टी.एम.करडे, बी.एस. राजपूत, डी.आरेक रेडी, भोला ईश्वर, तुर्की येथील कॅन अॅकटास, पोर्टोनोवो बेनीन येथील पीआर जोएल तोसा, ब्राझील येथील स्टपने होन्डजो, इंराण येथील मो. रेजामोलाईल आदी शास्त्रज्ञ सहभागी होणार आहेत. याशिवाय १४ देशातील शास्त्रज्ञांचा समावेश असलेली सैद्धांतिक सल्लागार समितीचे सुद्धा (पान २ वर)

हिंदुस्थान दि० २४/११/१५

(पान १२ वरुन) **विद्यापीठात जनरल...**

गठन करण्यात आले आहे. नवी दिल्ली येथील विद्यापीठ अनुदान आयोग, विज्ञान व तंत्रज्ञान विभाग व विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. २५ तारखेला परिषदेचे उद्‌घाटन होणार असून यावेळॅ इंडीयान विद्यापीठ रायपुरचे माजी कुलगुरु तथा गणितज्ज्ञ डॉ.टी.एम. करडे उपस्थित राहणार असून स्पेन येथील आयसीआरटीए संस्थेचे प्रो.डी.सरगेई ओडीनत्सोव बीजभाषण करणार आहे. यावेळी अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मोहन खेडकर राहतील. प्र.कुलगुरु डॉ.जयकिरण तिडके व विज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ.एफ.सी.रघुवंशी यांची प्रामुख्याने उपस्थित राहतील. पत्रपरिषदेला कुलसचिव डॉ. अजय देशमुख, डॉ. सपकाळ, वित्त व लेखा अधिकारी डॉ. शशीकांत आसोले, जनसंपर्क अधिकारी विलास नांदूरकर उपस्थित होते.